महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन आदेश क्रमांकः एएससी-१४११/प्र.क्र.९३/२०११/१४-अ
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक: १५ जानेवारी, २०१६

संदर्भ - १) सा.प्र.वि.पत्र क्र.संकीर्ण-१००४/प्र.क्र.४८/०४/१४-अ, दिनांक ७.६.२००४.
२) सा.प्र.वि.पत्र क्र.संकीर्ण-१००७/प्र.क्र.११८/०७/१४-अ, दिनांक १३.९.२००७
३) सा.प्र.वि. आदेश क्र.सीसीए-१७११/प्र.क्र.९३/२०११/१४-अ, दि.८.१२.२०११

शासन आदेश

सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार कालबध्द पदोन्नतीचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ लिपिक-टंकलेखकांना विभागातील ज्येष्ठतेनुसार विभागातील सहायकांच्या रिक्त पदांवर अंतरिम व्यवस्था म्हणून तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक पदोन्नती देण्याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना दिनांक ७.६.२००४ रोजीच्या पत्रानुसार विभागाच्या प्रशासकीय विभागप्रमुखांना अधिकार प्रदान करण्यात आले आहेत, तसेच दिनांक १३.९.२००७ रोजीच्या पत्रानुसार एक दिवसाचा तांत्रिक खंड देवून स्थानिक पदोन्नतीस मुदतवाढ देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. आता संदर्भ क्र.३ नुसार सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार कालबध्द पदोन्नतीचा लाभ घेणाऱ्या ज्येष्ठ लिपिक-टंकलेखकांना सहायक पदावर पदोन्नीसाठी लिपिक-टंकलेखकांच्या सामाईक ज्येष्ठतेनुसार सहायकांच्या रिक्त पदांवर अंतरिम व्यवस्था म्हणून तात्पुरत्या स्वरुपात स्थानिक पदोन्नती देण्याबाबत विभागप्रमुखांना दि.७.६.२००४ च्या पत्रान्वये दिलेले अधिकार रद्द करण्यात आले असून या विभागामार्फत लिपिक-टंकलेखकांना सामाईक ज्येष्ठतासूचीच्या आधारे सहायक पदावर पदोन्नती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२. त्यानुसार खालील तक्त्यामधील लिपिक-टंकलेखकांना सहायक पदावर तदर्थ पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीनंतरची पदस्थापना त्यांच्यानावासमोर दर्शविण्यात आली आहे.

अ. क्र.	श्री/श्रीमती	नांव	प्रवर्ग	सध्याचा विभाग	पदोन्नतीनंतरचा विभाग
१	२	३	४	५	६
१	श्रीमती	उ.उ.वेंगुर्लेकर	इमाव	ग्राविवजसंवि	ग्रामविकास व जलसंधारण विभाग
२	श्री	र.सं.गजभारे	अजा	गृह विभाग	गृह विभाग

३. लिपिक-टंकलेखकांना सहायक पदावरील तदर्थ पदोन्नती त्यांचेविरुध्द कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी प्रलंबित नाही, या धारणेच्या अधीन तसेच खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

(अ) उपरोक्त तदर्थ पदोन्नत्या मा. उच्च न्यायालयातील याचिका क्रमांक T.A.१/२०१४, T.A.२/२०१४ (रिट याचिका क्रमांक ८४५२/२००४) संदर्भात मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दि.२८.११.२०१४ रोजी दिलेल्या निर्णयाविरुध्द मा.उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिका क्रमांक २७९७/२०१५ मध्ये दिनांक २०.०३.२०१५ नुसार दिलेल्या स्थगितीच्या अधीन राहून देण्यात येत आहेत.

(ब) सदर तदर्थ पदोन्नती अकरा महिने किंवा सामान्य प्रशासन विभागाकडून निवडसूचीवरील नियमित सहायक नियुक्त होईपर्यंत यापैकी जे लवकर घडेल तेवढया कालावधीकरीता असेल.

(क) सदर पदोन्नती सामान्य प्रशासन विभाग का.क्र.१६-ब च्या दिनांक १६/६/२००८ च्या परिपत्रकातील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(ड) या तदर्थ पदोन्नतीमुळे संबंधित लिपिक-टंकलेखकांना नियमित पदोन्नतीचे, ज्येष्ठतेचे किंवा आणखी कोणतेही हक्क प्राप्त होणार नाहीत.

३. हे आदेश तात्काळ अंमलात येतील. पदोन्नत झालेल्या लिपिक-टंकलेखकांना संबंधित विभागाने तात्काळ कार्यमुक्त करुन या विभागास कळवावे, तसेच पदोन्नत लिपिक-टंकलेखकांनी पदस्थापना केलेल्या विभागात तात्काळ रुजू व्हावे, त्यांच्या पदस्थापनेत बदल करण्यासंबंधीच्या विनंतीची दखल घेण्यात येणार नाही.

सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०११५१२४०५९६००७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Subhash Hanmant Umaranikar

Digitally signed by Subhash Hanmant Umaranikar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=d5ea2bb9565eeb9b02d583f130371941a03fc5d98df65d3daafe66960a165024, serialNumber=596a24adfcfcd3edb4245812c0eaccecdf4de3ec6a308b42a682a980bca4db38, cn=Subhash Hanmant Umaranikar
Date: 2016.01.15 12:42:38 +05'30'

(सु.ह.उमराणीकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संबंधित लिपिक-टंकलेखक (विभागामार्फत)

प्रत,

१. अ.मु.स./प्रधान सचिव/सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. सह सचिव/उप सचिव (आस्थापना), ग्रामविकास व जलसंधारण विभाग/गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. संबंधित सहायक (कार्यासन १४ अ), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
४ निवड नस्ती, कार्यासन क्रमांक १४-अ.
५. संग्रहार्थ.